



स्वतंत्र दिनाच्या सर्व वाचक प्रेक्षक यांना हार्दिक शुभेच्छा

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 15/08/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 182 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला निर्देश

## बिहारमध्ये यादीतून हटवलेली 65 लाख मतदारांची नावे कारणासह प्रसिद्ध करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



दिल्ली : बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीची विशेष सखोल तपासणी (एसआयआर) सुरू आहे. दरम्यान ही मोहिम राबवल्यनंतर प्रकाशित करण्यात आलेल्या ड्राफ्ट मतदार याद्यांमधून सुमारे ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी (१४ ऑगस्ट) झालेल्या सुनावणीनंतर या वगळण्यात आलेल्या जवळपास ६५ लाख मतदारांच्या नावांची यादी जिल्ह्यानिहाय, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाइटवर प्रकाशित करावी असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला दिले आहेत. इतकेच नाही या यादीमध्ये मतदाराचे नाव वगळण्याचे कारण जसे की, मृत्यू, स्थलांतर, डबल रजिस्ट्रेशन इत्यादी देखील स्पष्ट करावे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

तसेच ही माहिती बिहारचे मुख्य निवडणूक आधिकरी यांच्या वेबसाइटवर देखील दाखवली जावी आणि हे डॉक्युमेंट असे असावे ज्यामध्ये ईपीआयसी क्रमांक टाकून नाव शोधता आले पाहिजे, असेही कोर्टाने म्हटले आहे.बिहारमधील विशेष सखोल तपासणीला आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले.

खंडपीठापुढे या प्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी (२२ ऑगस्ट) होणार आहे.

# लवकरच 'मुंबई विदिन 59 मिनिट्स' - मुख्यमंत्री

## वर्षाला किमान 50 किलोमीटरचे मेट्रो मार्ग उभारण्याचे काम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : काही वर्षांपूर्वी आपण 'मुंबई विदिन ५९ मिनिट्स' हे स्वप्न पाहिले होते. हे स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे. मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारात असून वर्षाला किमान ५० किलोमीटरचे मेट्रो मार्ग पूर्ण होत आहेत. तसेच रस्त्यांचे जाळे चांगल्या प्रकारे उभारले जात असून वाहतूक कोंडीतून मुंबईकरांची सुटका करणाऱ्या दोन महत्त्वाच्या लिंक पुलांचे लोकार्पण करण्यात आले आहे. यामुळे पूर्व आणि पश्चिम उपनगर प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला मुंबईकरांसाठी या प्रकल्पांचे लोकार्पण करताना आनंद होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.वांद्रे येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पोडियम येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महापालिकेच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व लोकार्पण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शहरात सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे नागरिकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडत आहेत. मेट्रोचे जाळे ४५० किमीपेक्षा जास्त विस्तारले असून, त्यामुळे पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील प्रवास सुकर होईल. वाहतूक कोंडी कमी होईल, इंधनाची बचत होईल आणि वेळ वाचेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची गुणवत्ता सुधारण्यासाठी मेट्रो आणि इतर प्रकल्प वेगाने राबवले जात आहेत. काही प्रकल्प नियोजित वेळेआधी पूर्ण झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, मुंबईच्या प्रगतीचा वेग देशाच्या विकासासाठी अनिवार्य आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी असल्याने तिच्या सर्वांगीण विकासासाठी विकास कामे केली जात आहेत. सार्वजनिक सुरक्षितता आणि दर्जेदार पायाभूत सुविधा यासाठी शासन कटिबद्ध आहे.यावेळी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मंडळे येथे उभारलेल्या ७० कोटी रुपयांच्या मेट्रो प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रशिक्षण संस्थेमुळे मेट्रो साठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार असून प्रशिक्षणासाठीचा खर्च वाचणार आहे. तर इतर राज्यातील मेट्रो प्रकल्पासाठीचे मनुष्यबळ प्रशिक्षित करून महसूल मिळणार आहे. तसेच चेंबूर – सांताक्रुझ लिंक केबल स्टेड पूल, रोड भाग 1 हा अशिया खंडातील 100 मीटर त्रिज्येचा सर्वात मोठा वक्राकार केबल स्टेड पूल आहे. तसेच 90 कोटी रुपयांच्या मालवणी येथील कर्मचारी निवासस्थान इमारत ज्यामध्ये एकूण 156 सदनिका असणाऱ्या दोन इमारती आहेत. कलानगर जंक्शन येथील आर्म डी उड्डाणपूल तसेच धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारा रस्त्यावरील 5.25 कि.मी लांबीच्या विहार क्षेत्र, पादचारी भुयारी मार्गाचे लोकार्पण करण्यात आले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे मोफत आरोग्य शिबिर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महापालिका वैद्यकीय विभागातर्फे नागरी आरोग्य पोषण दिनानिमित्त जाधववाडी येथील सावतामाळी सभागृह येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात ५५० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. शिबिराचे उद्घाटन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या हस्ते करण्यात आले.**



या शिबिरात आकुर्डी रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने नागरिकांना वजन, उंची, बीएमआय (शरीर वस्तुमान निर्देशांक), रक्तदाब मोजणी, संपूर्ण रक्त तपासणी (सीबीसी), पीबीएस, अकस्मात रक्तातील साखर तपासणी (बीएसएल-आर), सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, नियमित लसीकरण, छातीचा एक्स-रे, थुंकी तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, आभा व आयुष्मान कार्ड नोंदणी यांसह विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, दंतरोग, नाक-कान-घसा व फिजिशियन तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले आणि सर्व प्रकारच्या औषधांचे मोफत वितरण करण्यात आले.

शिबिरात वैद्यकीय विभागाच्या सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, आकुर्डी रुग्णालयाचे नोडल अधिकारी डॉ. हरिदास शेंडे, डॉ. बाळासाहेब होडगर व इतर अधिकारी उपस्थित होते.

शिबिराचे यशस्वी नियोजन करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य परिचारिका (पीएचएन) शाहीन खान यांनी विशेष परिश्रम घेतले.पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागाकडून यापुढील काळात नागरी आरोग्य पोषण दिन (यूएचएनडी) अंतर्गत नवीन आकुर्डी रुग्णालय, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, नवीन भोसरी रुग्णालय, यमुनानगर रुग्णालय, नवीन जिजामाता रुग्णालय, सांगवी रुग्णालय आणि नवीन थेरगाव रुग्णालय यांच्या तर्फे शहरातील विविध ठिकाणी मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

नागरिकांनी शक्य तितक्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. सागर तांबेंना 'बेस्ट प्रेझेंटेशन पेपर पुरस्कार'

## दक्षिण कोरियातील परिषदेत एमआयटी एडीटी विद्यापीठाची झळाळी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुण्यातील एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. सागर तांबे यांनी दक्षिण कोरियातील युनिव्हर्सिटी ऑफ उल्सान येथे झालेल्या १७व्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ह्युमन सिस्टम इंटरॅक्शन (IEEE HSI 2025) मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी नोंदवली.**



एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या इंटरनॅशनल रिलेशन्स सेलचे सदस्य म्हणून डॉ. तांबे यांनी "वास्तविक जगात सहाय्यक तंत्रज्ञानाची प्रगती" या विषयावर सत्राध्यक्ष म्हणून काम पाहिले तसेच महत्त्वपूर्ण तांत्रिक संशोधन सादर केले. त्यांच्या या सक्रिय सहभागामुळे आणि नेतृत्वगुणांमुळे भारताची शैक्षणिक व तांत्रिक उपस्थिती जागतिक पातळीवर अधोरेखित झाली.

या परिषदेत डॉ. तांबे यांनी विविध देशांतील प्राध्यापक व संशोधकांशी संवाद साधत संयुक्त संशोधन प्रकल्प, विद्यार्थी व प्राध्यापक देवाण-घेवाण कार्यक्रम, उद्योग-विद्यापीठ सहकार्य आणि तांत्रिक हस्तांतरण यांसारख्या संधींसाठी मार्ग मोकळा केला.

डॉ. तांबे यांच्या या आंतरराष्ट्रीय गौरवानंतर माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा.कराड, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, संचालक डॉ. विपुल दलाल, अधिष्ठाता डॉ. रजनीकौर सचदेव-बेदी, डॉ. रेखा सुगंधी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

डॉ. तांबे यांनी डॉ. जयश्री प्रसाद आणि डॉ. रजनीशकौर सचदेव यांच्या सहलेखनातून सादर केलेल्या "वायरलेस बॉडी सेन्सर नेटवर्कचे तुलनात्मक विश्लेषण: ओएमएनईटी++, कॅस्टालीया, एनएस३ए" या संशोधनपत्राला परिषदेत 'बेस्ट प्रेझेंटेशन पेपर पुरस्कारा'ने गौरवण्यात आले.

या संशोधनात वायरलेस बॉडी सेन्सर नेटवर्क्ससाठी (डब्ल्यूबीएसएनएस) विविध सिम्युलेशन टूल्सचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले असून, हे संशोधन मानवी-केंद्रित वायरलेस प्रणालींच्या संशोधक आणि तांत्रिक तज्ज्ञांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

# 'बेटर-हाफची लव्हस्टोरी'चा भन्नाट ट्रेलर प्रदर्शित

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

प्रेम, भूत आणि हास्याचा भन्नाट मेळ घालणारा आगामी मराठी चित्रपट 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या घोस्ट कॉमेडीचा दमदार ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांच्या उत्सुकतेला अधिकच उधाण आले आहे. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू ही हटके जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने मोठ्या पडद्यावर धमाल उडवायला सज्ज झाली आहे. या आधी 'पालतू फालतू' या मजेशीर गाण्यामुळे आणि 'ना कळले कधी तुला' या भावनिक गीतामुळे चित्रपटाविषयी कुतूहल निर्माण झालं होतंच, परंतु आता आलेल्या ट्रेलरमुळे प्रेक्षकांना या




प्रेमकथेच्या गोंधळातल्या धमाल प्रवासाची झलक पाहायला मिळाली आहे.

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत, रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित या सिनेमाच्या ट्रेलरमध्ये एक वेगळी आणि हटके प्रेमकथा उलगडताना दिसते. सुबोध भावे याची 'बेटर-हाफ' म्हणजे पत्नी गेल्यानंतर तिचा आत्मा त्याच्याच शरीरात वास करत असल्याचं गोंधळलेलं चित्र ट्रेलरमध्ये पाहायला मिळतं.

त्यातून सुटका मिळवण्यासाठी सुरू होतो विनोदी संघर्ष, ज्यात प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांची त्याला साथ मिळते. आता यातून सुबोध भावाची सुटका होते का, याचे उत्तर मात्र प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.

दिग्दर्शक संजय अमर या चित्रपटाविषयी सांगतात, "ही घोस्ट कॉमेडी असली तरी ती एका आगळ्यावेगळ्या प्रेमकथेची सांगड घालते. कलाकारांच्या ताकदीमुळे ही संकल्पना पडद्यावर प्रभावीपणे साकारता आली. सुबोध आणि रिंकूची फ्रेश जोडी, प्रार्थना आणि अनिकेतसारखे अनुभवी कलाकार यांचं योगदान अमूल्य आहे."चित्रपटाचे निर्माता रजत अग्रवाल म्हणतात, "आजच्या पिढीला नेहमी काहीतरी हटके आणि नाविन्यपूर्ण बघायचं असतं. 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' हे त्याचं उत्तम उदाहरण आहे. यामध्ये विनोद, सस्पेन्स, भावना आणि स्टारकास्ट यांचं परिपूर्ण मिश्रण आहे."

या चित्रपटाचे लेखन, छायांकन आणि दिग्दर्शन संजय अमर यांचेच असून, साजन पटेल आणि अमेय नरे यांनी संगीताची जबाबदारी सांभाळली आहे.

सुबोध भावे, रिंकू राजगुरू, प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांच्यासारख्या दमदार कलाकारांच्या अभिनयाने साकारलेला हा सिनेमा येत्या २२ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# देशभक्तीचा उत्साह आणि स्वच्छतेचा संकल्प अनोखा संगम

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणांनी दुमदुमलेला परिसर... हातामध्ये अभिमानाने फडकणारा तिरंगा... रस्त्यांवरून शिस्तबद्धपणे पुढे सरसावणारी भव्य बाईक रॅली... देशभक्तीचा उत्साह, स्वच्छतेचा संकल्प आणि पर्यावरणप्रेमाचा संदेश यांचा एकत्रित सोहळा आज पिंपरी चिंचवडमध्ये अनुभवायला मिळाला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा आणि हर घर स्वच्छता' अभियानाच्या निमित्ताने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली आज भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिशक्ती येथून सकाळी ७ वाजता सुरू झालेली ही रॅली महापालिका मुख्यालयापर्यंत देशभक्तीच्या वातावरणात आणि प्रचंड उत्साहात पार पडली.

या रॅलीत महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहायक आरोग्य अधिकारी राजू साबळे, अंकुश झिटे, सुधीर वाघमारे,



किशोर दरवडे, शांताराम माने, महेश आढाव, श्रीराम गायकवाड, उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, यमुनानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे गजानन ढमाले , रवींद्र कुकडे यांच्यासह विविध भागातील ज्येष्ठ नागरिक, महापालिकेच्या अग्निशमक, आरोग्य, जनसंपर्क, स्थापत्य, विद्युत तसेच विविध विभागातील कर्मचारी यांसह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' आणि 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सहभागी नागरिकांनी 'माझी वसुंधरा' व स्वच्छतेची सामूहिक प्रतिज्ञा घेऊन पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त शहर आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.

रॅलीत सहभागी बाईकस्वारांनी तिरंग्यांनी सजवलेल्या वाहनांसह शिस्तबद्धपणे प्रवास करत नागरिकांना देशभक्तीचा आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला. या उपक्रमातून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशभक्तीबरोबरच स्वच्छतेचे आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे जनमानसात रुजवण्यात आले.

तसेच महापालिकेच्या 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' या उपक्रमाचा उद्देश केवळ स्वातंत्र्य दिनाचा उत्सव साजरा करणे नसून, नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय आणि पर्यावरणपूरक जीवनशैली रुजवणे असल्याचे यावेळी आरोग्य विभाग प्रमुख उप आयुक्त सचिन पवार यांनी सांगितले तसेच या निमित्ताने शहरातील प्रत्येक घरावर तिरंगा फडकवण्याचे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. तर शहर स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण वृध्दीसाठी शहरात झाडे लावण्याचा सामुहिक संकल्पही करण्यात आला.

आम्ही भारताचे सुजाण नागरिक शपथ घेतो की, आम्ही या भारत मातेला, या वसुंधरेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करू, या वसुंधरेला या पर्यावरणाला आमच्यापासून कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेऊ. आम्ही या देशाला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी कटीबध्द राहू व आमच्याकडून पर्यावरणाला त्रास होईल, असे कोणतेही काम आम्ही करणार नाही, जास्तीत जास्त झाडे लावून या देशाला या वसुंधरेला स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदुषणमुक्त करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू", अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. शपथेचे वाचन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 15/08/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# एमपीएससीसाठी 'प्रतिभा सेतू' योजना लागू करा - आ. अमित गोरखे

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) धर्तीवर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू' ही योजना राज्यात लागू करावी, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीमुळे एमपीएससी च्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.यापूर्वी, नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यानही आमदार गोरखे यांनी हा महत्त्वाचा मुद्दा सभागृहात उपस्थित करत सरकारचे लक्ष वेधले होते**

आमदार गोरखे यांनी आपल्या निवेदनात या योजनेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. 'प्रतिभा सेतू' या योजनेअंतर्गत यूपीएससीच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या परंतु काही कारणांमुळे अंतिम निवड न झालेल्या उमेदवारांची माहिती संकलित केली जाते. ही माहिती एक पोर्टल तयार करून सरकारी, खाजगी आणि इतर संस्थांना उपलब्ध करून दिली जाते, ज्यामुळे या पात्र उमेदवारांना त्यांच्या योग्यतेनुसार नोकरीच्या संधी मिळतात.त्याच धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षा अत्यंत स्पर्धात्मक असतात आणि दरवर्षी हजारो विद्यार्थी राज्यसेवा, गट ब आणि गट क परीक्षांमध्ये सहभागी होतात. त्यापैकी, मुख्य परीक्षा किंवा मुलाखत देऊनही अंतिम निवड न झालेल्या विद्यार्थ्यांकडे दर्जेदार शैक्षणिक पात्रता आणि आवश्यक कौशल्ये असतात. या उमेदवारांची माहिती एकत्र करून एक पोर्टल तयार केल्यास, ही माहिती खाजगी संस्था, शैक्षणिक संस्था, महापालिका, जिल्हा परिषद आणि इतर सहकारी संस्थांसोबत शेअर करता येईल. याचा उपयोग तात्पुरत्या किंवा प्रकल्पाधारित भरतीमध्ये होऊ शकतो, ज्यामुळे या तरुणांनी घेतलेली मेहनत आणि जर वयाची मर्यादा निघून गेली असलेल तर त्यांच्यासाठी ही संधी महत्त्वाची ठरू शकते.या योजनेमुळे राज्यातील सामाजिक समता, प्रशासकीय प्रतिनिधित्वाची संधी आणि युवा सक्षमीकरणाला मोठा हातभार लागेल, असा विश्वास आमदार गोरखे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीमुळे हजारो होतकरू विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, अशी आशा गोरखे यांनी व्यक्त केली आहे.

# भोसरी एमआयडीसीत पोलीसगस्त वाढवा - अभय भोर

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



**भोसरी : स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) आणि त्यानंतर येणाऱ्या शनिवार-रविवारच्या सलग सुट्ट्यांमुळे एमआयडीसी परिसरात अनेक कंपन्या व उद्योग बंद राहणार आहेत.**

**अशा काळात चोरी, कंपन्यांमध्ये सामूहिक चोऱ्या एमआयडीसी परिसरात दारुड्यांचा मुक्त वावर किंवा अन्य गैरप्रकार होण्याची शक्यता वाढते.**

त्यामुळे एमआयडीसी परिसरातील उद्योग व कंपन्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त वाढविण्याची मागणी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी केली आहे.

भोर यांनी सांगितले की, “सुट्टीच्या काळात अनेक कंपन्यांमध्ये उत्पादन व मनुष्यबळ कमी असल्यामुळे सुरक्षेची जोखीम वाढते.

आणि सलग तीन दिवस सुट्ट्यांचा फायदा घेऊन अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक परिसरामध्ये फिरत असतात यासाठी दिवसा आणि रात्री पोलिसांनी गस्त वाढवावी, संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस तैनात करावेत व रात्रीच्या वेळी विशेष पथक कार्यरत ठेवावे.”

या संदर्भात त्यांनी संबंधित पोलीस स्टेशन ने योग्य ती खबरदारी आवाहन संबंधित पोलीस स्टेशन आणि प्रसिद्धी पत्राद्वारे केले आहे,

जेणेकरून उद्योग परिसर सुरक्षित राहील व कोणत्याही प्रकारची चोरी किंवा तोडफोड होणार नाही.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968